स्थापना
१ मे १९५७

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११०३७
www.puneapmc.org / Email : kubspune37@rediffmail.com

D:\२०२४-२५\भांडार\लेटर.docx.१३६

जा.क्र.प्रशा/भां.व छ.ले.सा.वि./प्र.प/३३२५/२०२४-२५ दि. :- २७/१२/२०२४.

**प्रसिध्दी पत्रक**

विषय :- अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा देखभाल दुरूस्तीचे काम करणेकामी दरपत्रके सादर करणेबाबत.

वरील विषयास अनुसरून सर्व पुरवठाधारक / ठेकेदार यांना कळविणेत येते की, कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेचे मुख्य कार्यालयातील सिमेंन्स कंपनी चे डिजीटल ई.पी.बी.एक्स. अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा व ३५ इंटरकॉम चा देखभाल दुरुस्तीचा नॉन क्रॉम्प्रेंसिव ठेका देणेकामी दरपत्रके मागवित आहोत.

सदर कामी खालील नियम व अटींचे अधीन राहून आपले कमीत कमी दराचे दरपत्रक सिलबंद पाकीटामध्ये दि. ३ / १ /२०२५ अखेर दु. १.०० वाजेपावेतो संस्थेच्या भांडार शाखेत पोहोच करावे.

१. दरपत्रकामध्ये फर्मचा जी.एस.टी. क्रमांक, पत्ता, दुरध्वनी क्रमांक नमूद करावा.
२. दरपत्रकामध्ये मूळ दर अधिक जी.एस.टी. दर याप्रमाणे दर नमूद करावेत तसेच दरपत्रकामध्ये कामाचा एच.एस.एन. कोड नमूद करावा.
३. बाजार समितीचे कार्यालयातून देखभाल दुरूस्तीसाठी बोलविलेनंतर तात्काळ हजर राहणे बंधनकारक असेल.
४. सदर ठेका हा नॉन क्रॉम्प्रेंसिव असल्याने दुरूस्ती कामासाठी आवश्यक असलेले साहित्य बाजार समिती पुरवठा करेल. बाजार समितीने साहित्य पुरवठा केल्यानंतर ते विनामोबदला बसवून देणे ठेकेदारावर बंधनकारक असेल. तसेच दुरूस्ती कामाच्या आवश्यकतेनुसार आवश्यक असलेले साहित्य प्रचलित घावुक बाजारभावाने बाजार समितीस पुरवठा करणे ठेकेदारावर बंधनकारक राहिल.
५. कामकाजामध्ये हलगर्जीपणा, त्रुटी आढळल्यास कोणतेही कारण न देता सदर ठेका रद्द करणेत येईल.
६. मुदतीनंतर दरपत्रक स्विकारले जाणार नाही.
७. दरपत्रक उघडतेवेळी संबंधित पुरवठाधारक / ठेकेदार अथवा त्यांचे प्रतिनिधीने बाजार समितीचे मुख्य कार्यालयात वेळेत हजर रहावे.
८. कोणतेही दरपत्रक अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क कृषी उत्पन्न बाजार समितीने राखून ठेवला आहे.
९. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. ३ / १ /२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात मा. सहसचिव यांचे दालनात दरपत्रके सीलबंद असलेची खात्री करून उघडणेत येतील. दरपत्रके उघडणेचे वेळेत बदल झाल्यास ठेकेदारांना दुरध्वनीव्दारे कळविणेत येईल याची नोंद घ्यावी.
१०. नियम व अटी मान्य असणाऱ्या ठेकेदारांनीच दरपत्रके सादर करावीत.

सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

फोन : +९१ २० २४२६०२०३/२४२६२३४९/२४२७२८८७